*मुळा एज्युकेशन सोसायटीचे*

## कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई

## राष्ट्रीय सेवा योजना

# योगा व प्राणायाम (आर्ट ऑफ लिव्हिंग) व्याख्यान

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २०/०९/२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयातील सेमिनार हॉल येथे विद्यार्थ्यांमध्ये योगा व प्राणायाम यांचे महत्व व जागृती निर्माण व्हावी याकरिता व्याख्यान आयोजित केले गेले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून समर्थ रामदास स्वामी विद्यालय कंगोणी येथील मुख्याध्यापिका श्रीमती आशाताई कर्डिले ह्या उपस्थित होत्या. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. तुकाराम जाधव यांनी सूत्रसंचालन केले. रासेयो प्रमुख डॉ. विठ्ठलराव दरंदले यांनी पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. शरद औटी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. दिपप्रज्वलन व ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. प्रथम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकरराव लावरे यांनी कार्यक्रमास सुभेच्छा दिल्या या नंतर कार्यक्रमाच्या अध्यक्ष तनिष्का आमदार प्राध्यापिका जयश्रीताई गडाख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख मार्गदर्शक श्रीमती आशाताई कर्डिले यांनी दैनंदिन जीवनामध्ये व्यायाम , योगा व प्राणायाम यांचे महत्व अष्टसूत्रीरीद्वारे विषद केले, यावेळी त्यांनी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहार विहार व व्यायाम याद्वारे विद्यार्थ्यांपुढे स्वष्ट केली. सत्य, सय्यम, सदाचार, भुतदया, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, सामाजिक जाणीव, परोपकार इत्यादि मूल्यांचे जीवनातील महत्व त्यांनी यावेळी संगितले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक तुवर , अकॅडेमीक चेअरमन डॉ. स्वेता चौधारे , प्रा. अरुणा पवार इत्यादि उपस्थित होते. एकूण २५० रासेयो स्वयंसेवकांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल निपुंगे यांनी उपस्थितांचे आभार मानले. दुपारी १.०० वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.

रासेयो कार्यक्रम अधिकारी

## कार्यक्रम छायाचित्रे :

















